ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय उद्योगाचा इतिहास आणि अर्थव्यवस्थेतील योगदान



**श्री देशमुख शेषणारायण किसन**
(सहाय्यक प्राध्यापक) माऊली महाविद्यालय, वडाळा.ता. ऊ. सोलापूर

## प्रस्तावना:

मध्ययुगानांतर भारतावर ब्रिटिशांनी व्यापारी आक्रमण व नंतर सतेचा एंक छतरीअमल प्रस्तावित झाला आणि मिडलैंड्स मध्ये व यूके मधे औद्योगिक क्रांति झाली त्याचे लोन एशियन देशांमध्ये वेगाने पसरले त्यामध्ये हॉगकॉग, सिंगापूर, दक्षिण कोरिया यांनी वेगाने प्रगती केली. त्यांच्याकडे स्थिर सरकार, संरचीत समाज, धोरणात्मक निर्णय घेण्याची क्षमता व परकीय गुंतवणुकीचे स्वागत स्थानिक कुशल श्रमिक यामुळे त्यांनी वेगाने प्रगती केली ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांतीने वेग धारण केला होता त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा भारताला झाला व भारतामध्ये औद्योगिक मुहूर्तमेढ रोवली गेली 1854 मध्ये पहिली कापड गिरणी मुंबईमध्ये सुरू करण्यात आली नंतर उत्तरोत्तर विविध उद्योगांची स्थापना होऊन भारतामध्ये औद्योगिक प्रगती झालेली दिसून येते

## संशोधन उद्देश

1. भारतीय उद्योगाचा इतिहास अभ्यासणे.
2. अर्थव्यवस्थेच्या विकासातील उद्योगाची भूमिका समजून घेणे.
3. उद्योगाची विविध टप्प्यातील प्रगती समजून घेणे.

## संशोधन पद्धती;

उपरोक्त संशोधन दुय्यम साधनांवर आधारित आहे यासाठी विविध लेख, विविध पुस्तके, विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके व वर्तमानपत्रे यांचा वापर केला आहे.

भारतीय उद्योगांचा इतिहास, ब्रिटनच्या औद्योगिक क्रांतीचे लोन हळूहळू संपूर्ण भारतभर पसरले ब्रिटनने स्वतःच्या स्वार्थापोटी भारतामध्ये उद्योगाच्या स्थापनेला व विस्ताराला अप्रत्यक्षरीत्या व प्रत्यक्षरीत्या मदत केली यातूनच विविध उद्योगांची भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात स्थापना झालेली दिसून येते. यामध्ये मुख्यत्वे पुढील मुख्य उद्योगांचा उल्लेख करता येईल

१. 1854 मध्ये मुंबई येथे पहिली कापड गिरणी सुरू करण्यात आली
1. 1855 हुगळी कलकत्ता येथे जूट उद्योगाची स्थापना करण्यात आली
2. 1874 कुल्फी लोह आणि पोलाद स्टील वर्किंग कंपनीची स्थापना करण्यात आली.
3. 1872 मध्ये राणीगंज येथे कोळसा खाण्याची सुरुवात करण्यात आली.

4. 1907 मध्ये आयर्न आणि स्टील जमशेदपूर येथे स्थापना करण्यात आली.
5. 1904 मध्ये सिमेंट इंडस्ट्रीची चेन्नई येथे स्थापना करण्यात आली
6. 1837 मध्ये ॲल्युमिनियम इंडस्ट्री जय के नगर पश्चिम बंगाल येथे स्थापना करण्यात आली
7. 1906 मध्ये केमिकल अँड फर्टीलायझर या कंपनीची तामिळनाडू येथे स्थापना करण्यात आली
8. 1941 मध्ये शिपिंग उद्योगाची स्थापना करण्यात आली
9. 1940 मध्ये वाहन उद्योगाची सुरुवात करण्यात आली

अशा विविध उद्योगांची मोठ्या प्रमाणात सुरुवात स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतामध्ये झालेली दिसून येते या सुरुवातीने भारतीय अर्थव्यवस्थेत उद्योग व्यवसायाची मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

**साधारणतः**

1850 ते 1914 च्या दरम्यान कागद, जूट, कापड ,लोह, पोलाद अशा विविध मुख्य उद्योगांची स्थापना झालेले दिसून येते तर 1914 ते 1950 च्या दरम्यान दुसऱ्या महायुद्धाच्या कारणाने औद्योगिक स्थापनेची गती मंदावलेली दिसून येते.

कालखंडामध्ये1950 ते 65 दरम्यान 1948 च्या औद्योगिक धोरण तसेच 1956 च्या औद्योगिक धोरणामुळे आपल्या अर्थव्यवस्थेची भरभराट मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येते भारतीय अर्थव्यवस्थेची वेगाने प्रगती होण्यासाठी धोरणकर्त्यांनी निश्चित अशा औद्योगिक धोरण डोळ्यासमोर ठेवून अनेक उद्योगांचे मुहूर्तमेढ रोलेली स्वातंत्र्य उत्तर काळात दिसून येते. ज्याच्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाला वेग आला.

1965 ते 80; या कालखंडामध्ये चीन पाक युद्ध, दुष्काळ या कारणाने उद्योगधंद्यांची विशेष वाढ झालेली नाही परंतु लघुउद्योगाच्या विकासावर या कालखंडामध्ये तसेच पंचवार्षिक योजनांमध्ये विशेष तरतूद करून लघु उद्योगाच्या विकासाला गती देण्यात आली .

1980 ते 1991; या कालखंडामध्ये आयटी, कॉम्प्युटर अशा नाविन्यपूर्ण क्षेत्राच्या प्रगतीला सुरुवात झाली

1991 नंतरचा कालावधी; २४ जुलै 1991 नंतर आपण नवीन आर्थिक धोरण स्वीकारले, ज्या धोरणाला एलपीजी धोरण असे ओळखले जाते. ज्यामुळे आपल्या उद्योगाच्या तसेच अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सर्व सीमा खुल्या करण्यात आल्या अनेक सरकारी बंधने कमी करण्यात आली, परकीय भांडवलाचे स्वागत करण्यात आले, खाजगी गुंतवणूकदारांना वाव देण्यात आला. अशा अनेक महत्त्वपूर्ण व तात्विक निर्णयामुळे अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन सकारात्मक परिणाम दिसून आले व त्यातून औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात झालेचे दिसून येते, ज्यामुळे आज आपण संपन्न व पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झालेलो आहोत

**भारतीय उद्योगांचे विविध प्रकार**

1. कच्च्या मालाच्या पुरवठ्यावरून यामध्ये खनिजपुरवठ्यावरून व शेतमालपुरवठ्यावरून प्रकार करता येतो
2. उद्योगाच्या मालकीवरून यामध्ये एक खाजगी मालकी दोन सार्वजनिक मालकी तीन संयुक्त मालकी व सहकार अशा पद्धतीने उद्योगाचे वर्गीकरण करता येते.
3. उद्योगाच्या आकारावरून लघु मध्यम आणि मोठे उद्योग अशाप्रकारे उद्योगाचे वर्गीकरण करता येते

सध्या आधुनिक भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन करत असताना आपणाला विशेष उद्योगांची उल्लेखनीय कामगिरीबद्दल व विस्ताराबद्दल जाणीवपूर्वक उल्लेख करावा लागेल यामध्ये आयटी सेक्टर हेल्थ अँड फार्मा एज्युकेशन टेक्नॉलॉजी ईव्ही टेक्नॉलॉजी बँकिंग इन्शुरन्स मीडिया अँड इंटरटेनमेंट अशा नेहमीच्या उद्योगापेक्षा वेगाने प्रगती करणाऱ्या सेवा क्षेत्रातील उद्योगांची वाढ मोठ्या प्रमाणात झाली त्यामुळे रोजगार निर्मिती बरोबर उत्पन्नाचा स्तर मोठ्या प्रमाणात वाढलेला आपणाला दिसून येतो ज्यामुळे आपण उद्योग यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपली अर्थव्यवस्था जगनमान्य व निर्यात प्रधान केलेली दिसून येते ज्यामुळे आपल्याला मौलिक असे परकीय

चलन मिळते, या परकीय चलनाच्या आधारावर आपण संतुलित आणि समतोल अर्थव्यवस्थेच्या उत्पादनातील वाढीकडे वळू शकलो ज्याच्यामुळे आपली अर्थव्यवस्था कडे वाटचाल करताना दिसून येते.

**भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आधुनिक उद्योगांचे योगदान**

1. **शेती उद्योगाच्या विकासाला मदत:** भारतीय उद्योगधंद्यांच्या माध्यमातून शेतीच्या विकासाला गती देण्यामध्ये उद्योगांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आपणाला दिसून येते यामध्ये खते बी बियाणे यंत्रसामग्री ट्रॅक्टर20 अशा अनेक साधनांचा पुरवठा शेती क्षेत्राला केलेला आहे त्याचबरोबर शेती क्षेत्रातील उद्योग क्षेत्रातील अनेक उत्पादने शेतीच्या कच्च्या मालाच्या आधारावर निघताना आपल्याला दिसून येतात त्यामुळे शेती उद्योगाच्या विकासाला व उद्योग शेतीच्या विकासाला पूरक भूमिका करताना आपल्याला दिसून येते
2. **उपभोग्य वस्तूची निर्मिती:** कुठल्याही देशाची श्रीमंती तेथील लोकांच्या राहणीमानावर अवलंबून असते कधीकाळी वाहतुकीचे साधन म्हणून पायी चालणे आणि सायकल बैलगाडी सारख्या साधनांचा वापर करणाऱ्या देशांमध्ये आज मोठ्या प्रमाणात कुटुंबाकडे दु चाकी चार चाकी असल्याचे आपल्याला पाहायला मिळते तसेच आपल्या दैनंदिन उपभोगातील वस्तूंमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक वस्तूंचा वापर होताना आपणाला दिसून येतो त्यामुळे मानवी जीवन भौतिक सुखाच्या बाबतीत समृद्ध झालेले आपणाला दिसून येते याचे मुख्य कारण भारतीय औद्योगिक प्रगती हे आपणाला सांगता येईल
3. **नैसर्गिक साधनांचा पुरेपूर वापर:** भारताला खंडप्राय देश म्हणून ओळखले जाते सर्वच प्रकारचे हवामान, उत्तम प्रकारचा पाऊस,, जंगल संपत्ती खनिज संपत्ती अशी मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीभारतामध्ये उपलब्ध आहे. तिचा वापर होण्यासाठी औद्योगिक प्रगती होणे आवश्यक होते त्यामुळे सरकारने 1948 औद्योगिक धोरण,1956 च्या औद्योगिक धोरण,1977 च्या औद्योगिक धोरण,1991 च्या औद्योगिक धोरण या सर्व धोरणांच्या माध्यमातून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून या साधन संपत्तीचा पुरेपूर वापर होण्याच्या दृष्टीने अनेक उद्योगांची स्थापना व निर्मिती व विकास केला. ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला गती आलेली दिसून येते व आपण महासत्तेकडे वाटचाल करताना दिसते
4. **निर्यात वाढ:** जसजशी स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये औद्योगिक प्रगती होत गेली तसेच शेती आणि उद्योग यांची वेगाने प्रगती झालेली दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात चामड्याच्या वस्तू, मसाल्याचे पदार्थ, चहा अशा काही निवडक वस्तूंची आपण निर्यात करत होतो परंतु अलीकडल्या काळात आयटी क्षेत्र, ऑटोमोबाईल क्षेत्र ,औषध निर्माण अशा अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये आपली निर्यात वाढलेली दिसून येते त्यामुळे आपल्याला महत्त्वपूर्ण व मौलिक असे परकीय चलन उपलब्ध होते म्हणजेच औद्योगिक प्रगती शिवाय आपल्याला आयात पर्यायीकरण व निर्यात वाढ शक्य नव्हती जी औद्योगिक प्रगतीमुळे आपण साध्य केलेली आहे
5. **राष्ट्रीय उत्पन्नात वाढ:** कुठल्याही देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नावरून त्या देशाची श्रीमंती ठरवली जाते स्वातंत्र्योत्तर काळात आपण बरेच दिवस परकीय आक्रमणाच्या माध्यमातून आर्थिक शोषण झाल्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेचा सुरुवातीला भांडवलाची नितांत गरज होती सरकारने जाणीवपूर्वक औद्योगिक धोरणे राबवून राष्ट्रीय संपत्तीत वाढ करण्याचा म्हणजेच वस्तू निर्मितीचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न केलेला आहे याच्यातून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झालेली आपणाला दिसून येते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीवरून देशाचे राहणीमान व सुबत्ता ठरवली जाते.
6. **रोजगार निर्मिती:** भारतासारख्या खंडप्राय देशांमध्ये व 150 कोटीकडे लोकसंख्येची वाटचाल असणाऱ्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात छुपी बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, संघर्षात्मक बेरोजगारी असलेले आपणाला दिसून येते या बेरोजगारीवर कायमस्वरूपी उपाय करायचा असेल तर आपल्याला उद्योग आणि शेतीच्या पर्यायी प्रगती शिवाय पर्याय नाही म्हणून सरकारने वेगवेगळ्या औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्यांची स्थापना करून स्थानिक कच्च्या मालाचा विचार करून उद्योगाचे स्थानिकीकरण व्यवस्थित पद्धतीने केलेले दिसून येते ज्यामुळे ग्रामीण भागात जे हंगामी बेरोजगारी व छुपे बेरोजगारी आहे याच्यावर उपाय म्हणून आपण ग्रामीण औद्योगीकरण किंवा कृषी उद्योगाकडे पाहू शकतो, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे आजही आपल्या देशात काही अंशी बेरोजगारी असलेले दिसून येते परंतु वेगाने होणाऱ्या औद्योगिक प्रगतीमुळे किंवा औद्योगिक

स्थापनेमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेलीआपणाला दिसते ज्याचा उपयोग आपल्याला देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाला झालेला आहे.

7. **प्रादेशिक समतोल:** उद्योगधंद्याच्या प्रगतीमुळे स्वातंत्र्यपूर्व काळात जो भारतीय अर्थव्यवस्थेत असंतुल होता तो दूर करण्यासाठी अविकसित भागात अनेक उद्योगधंद्यांची निर्मिती पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून करून सरकारने समतोल साधण्याचा म्हणजेच प्रादेशिक समतोल साधण्याचा आर्थिक समतोल साधण्याचा प्रयत्न केलेला आपणाला दिसून येतो हे फक्त उद्योग क्षेत्राच्या वाढीमुळे झालेली दिसून येते.
8. **दारिद्र्य निर्मूलन:** औद्योगिक प्रगतीमुळे आपल्याला भारतामधील दारिद्र्य निर्मूलनात मदत झालेली दिसून येते दादाभाई नौरोजी यांनी पॉवर्टी ऑफ इंडिया या ग्रंथांमध्ये भारतातील दारिद्र्याला मुख्यत्वे ब्रिटिशांची सत्ता कारणीभूत होती हे आपल्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे कफल्लक आणि दारिद्र्य अवस्थेत असलेली आपली अर्थव्यवस्था पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून औद्योगिक विकास करून सरकारने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करून दारिद्र्य निर्मूलन केलेले आपणाला दिसून येते सरकारच्या या दारिद्र्य निर्मूलनाच्या धोरणामध्ये औद्योगीकरणाची महत्त्वपूर्ण भूमिका असलेली आपणाला दिसून येते.
9. **सरकारी उत्पन्नात वाढ:** सरकारला अनेक उत्पन्नाचे मार्ग असतात यामध्ये शेती उद्योग वेगवेगळ्या प्रकारचे शुल्क दंड, कर, आयात शुल्क, उत्पादन कर, संपत्ती कर अशा अनेक करांच्या माध्यमातून सरकार उत्पन्न गोळा करते यामध्ये उद्योग क्षेत्राच्या प्रगतीमुळे अनेक उद्योगांची स्थापना झाली व त्या उद्योगांच्या प्रगतीमुळे सरकारला मोठ्या प्रमाणात कराच्या माध्यमातून उत्पन्न मिळतं आपल्याला दिसून येते त्यामुळे सरकारी उत्पन्नाचा मुख्य मार्ग म्हणून औद्योगिक प्रगतीकडे आपणाला पाहता येईल.
10. **मूलभूत संरचना विकास:** भारतीय अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्यांच्या प्रगतीमुळे रस्ते, इंटरनेट, दळणवळण अशा अनेक सोयी सुविधांमध्ये वाढ झालेले आपणाला दिसून येते त्याचबरोबर प्रत्येक उद्योगधंद्यामध्ये अलीकडील काळात रिसर्च अँड इनोवेशन हा विभाग असल्यामुळे नव संशोधन व नव उपक्रम याला वाव मिळाल्याचे दिसून येते एकत्रित वरील अनेक प्रकारच्या ठळक बाबींमुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामुळे उद्योगाचे महत्त्व आपल्याला अधोरेखित करता येईल किंबहुना कुठल्याही देशाची प्रगती होताना उद्योगधंद्यांची प्रगती झाल्याशिवाय अर्थव्यवस्थेला गती येत नाही व देश महासत्ता बनत नाही हे आपण इतर देशांच्या इतिहासावरून जाणून घेत आपल्या औद्योगिक प्रगतीला वेगवान केलेले आहे.

## सारांश:

भारतीय उद्योगाचा इतिहास जाणून घेताना आपल्याला अनेक परकीय आक्रमणे अनेक परकीय सत्ता याला तोंड देत आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारावर सुरुवातीच्या काळात लोह, खनिज, कापड, तार असे उद्योग स्थापन झालेले दिसत असली तरी अलीकडील काळात आपण शैक्षणिक तांत्रिक यांत्रिक प्रगतीमुळे किंवा तंत्रज्ञानाच्या आयातीमुळे भांडवलाच्या उपलब्धतेमुळे मनुष्यबळाच्या सक्षम उपलब्धतेमुळे अनेक प्रकारच्या उद्योगधंद्यांची स्थापना करून जगामध्ये आपलं एक स्थान निर्माण केलेलं आहे ज्यामुळे आपण निर्यात प्रधान उद्योग स्थापन करून महत्त्वपूर्ण असे परकीय चलन मिळवण्यामध्ये आपल्याला यश आलेला आहे जगामध्ये नामांकित अशा देशाच्या पंक्तीमध्ये भारत औद्योगिक प्रगतीमुळे आज आपले स्थान बळकट करताना आपल्याला दिसून येतो.